॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431 606 (Maharashtra)

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++' grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

आज़ादी का अमृत महोत्सव

## MEETING & ELECTION SECTION



| Phone : (02462) 229246<br>Fax : (02462) 229572 | Website:<br>Srtmun.ac.in | E-Mail :<br>election@srtmun.ac.in |
|---|---|---|



अध्यापकांमधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी मतदार यादी तयार करण्यासाठी माहिती पाठविण्याबाबत...

## अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम 28(2) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. अधिसभेचे नव्याने गठण करावयाचे आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम 28(2)(r) नुसार अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून १० अध्यापक अधिसभेवर निवडून द्यावयाचे आहेत.

त्या अनुषंगाने प्रस्तूत विद्यापीठाशी सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थामधील सर्व अध्यापकांची यादी तयार करून त्यातून सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण तयार करावयाचा आहे.

तरी प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, स्वायत्त महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना या अधिसूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेत कार्यरत असलेल्या या सर्व मान्यताप्राप्त अध्यापकांची आवश्यक ती सर्व माहिती यासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात भरून आवश्यक ते दस्तऐवज जोडून विद्यापीठास e-mail : election@srtmun.ac.in या मेलवर excel and pdf file मध्ये दिनांक ३०/०६/२०२२ पर्यंत पाठवून हॉर्ड कॉपीची प्रत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सभा व निवडणूक विभागात दिनांक ०४/०७/२०२२ सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करावी.

अध्यापकांमधून अधिसभेवर नित्रडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी, महाराष्ट्र शासन राजपत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २८ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेतील पात्रता शर्ती या सोबत जोडला आहे.

प्रत्येक अध्यापक यांच्या माहितीसोबत खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित किंवा स्वसाक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे.

०१. पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल, प्राचार्य, परिसंस्थेचा संचालक, महाविद्यालयाचा ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक किंवा निर्देशक म्हणून विद्यापीठाच्या मान्यता पत्रांच्या छायांकित प्रती.

०२. अध्यापक राखीव प्रवर्गातील असल्यास त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत.

०३. नावात बदल झाला असल्यास नवीन नावाने नोंदणी करण्यासाठी शासन राजपत्र किंवा नवीन नाव असलेले आधार कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा अर्जासोबत जोडावा.

वरील कागदपत्राची प्रत्येक शिक्षकाच्या नावाने एक पीडीएफ फाईल तयार करुन ती ई–मेलद्वारे प्रपत्रासोबत पाठविण्यात यावी.

वरीलप्रमाणे माहिती विहित मुदतीत प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सभा व निवडणूक विभागात पाठवावी. ज्या महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या अध्यापकांची माहिती विहित मुदतीत प्राप्त होणार नाही, त्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील अध्यापकांच्या नावाचा संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थाच्या अध्यापकाने मिळून बनवलेल्या निर्वाचक गणामध्ये समावेश होणार नाही, त्यास संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेचा सादरकर्ता सर्वस्वी जबाबदार राहील.

**कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्वाचन अधिकारी,**
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**सोबत : वरीलप्रमाणे**
जा.क्रं. : सभा व निवडणूक/२०२२–२३/ 100
दिनांक : ०३/०६/२०२२

**प्रति,**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे, स्वायत्त महाविद्यालयांचे, मान्यता प्राप्त परिसंस्थांचे सर्व मा. प्राचार्य व मा. संचालक

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17 Sep 94 Nanded

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थातील विद्यापीठ मान्यता प्राप्त अध्यापकांची माहिती द्यावयाचा नमुना
## महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम 28(2)(r)

College / Institution Name :…………………………………………………..
College Code No. :……………………………………………………………....

| Sr. No. | Name of the Teacher (Surname First) | | Designation | Caste Category | Date of Joining | Educational Qualifications | Teaching Subject | Faculty | University approval letter number and date | Teaching Experience | | Photo | Teacher Signature | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | देवनागरी | English | | | | | | | | UG | PG | | | |
| 1 | २ | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

टिप :

१) विहित निवड प्रक्रियेद्वारा नियुक्त अध्यापक/तदर्थ अध्यापकांच्या नेमणूकीस विद्यापीठ मान्यतेची प्रत जोडावी. त्याशिवाय संबंधित माहिती ग्राहय धरली जाणार नाही.
२) धारणाधिकारावर असलेल्या अध्यापक/तदर्थ अध्यापकांच्या नावासमोर शेरा या रकान्यात धारणाधिकारावर असे स्पष्ट लिहून धारणाधिकाराचा कालावधी नमूद करावा.
३) नावात बदल झालेला असल्यास त्यासंबंधितचे आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती

प्रमाणित करण्यात येते की, वरील अध्यापकांची नेमणूक कायम/तदर्थ स्वरूपाची असून दिलेली माहिती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तरतुदीनुसार आहे.

दिनांक :
स्थळ :

प्राचार्य

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## अध्यापकांमधून विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडून देण्यासंदर्भातील महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदी

कलम २(१८) **''अध्यापकांचा गट''** याचा अर्थ, जे संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांच्या आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या अध्यापकांनी मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे;

कलम २(६१) **''अध्यापक''** याचा अर्थ, विद्यापीठाच्या कोणत्याही विभागातील संचालित, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयातील, स्वायत्त परिसंस्थेतील किंवा विभागातील किंवा विद्यापीठातील मान्यताप्राप्त परिसंस्थेतील पूर्णकालिक मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता, ग्रंथपाल, प्राचार्य, परिसंस्थेचा संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्राचा संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राचा संचालक, विद्यापीठाचा उप किंवा सहायक ग्रंथपाल व महाविद्यालयाचा ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालक किंवा निर्देशक, असा आहे;

कलम 28(2)(r) **अधिसभा**

प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्याखेरीज अध्यापक गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे दहा अध्यापक, ज्यांपैकी प्रत्येकी एक अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती असेल आणि एक महिला असेल;

## महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—ब, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई दिनांक २८.०४.२०१७ अन्वये अधिसूचनेतील अध्यापक यामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात पात्रता शर्ती :

कलम 28(2)(r) **अधिसभा**

अध्यापकांच्या गटाने त्यांच्यामधून निवडून दिलेले —

(क) पीएच.डी. पदवीधारक असावा आणि एकूण किमान दहा वर्ष अध्यापनाचा अनुभव असावा,

किंवा

एकूण किमान पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असावा

(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.

कुलसचिव तथा
निवडणूक निर्वाचन अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Swami Ramanand Teerth Marathwada University
Estd. 17 Sep 94
Nanded